प्रकरण - III

अर्थसंकल्पीय व्यवस्थापन

प्रकरण III
अर्थसंकल्पीय व्यवस्थापन

प्रशासकीय स्तरावर निधीचा अपव्यय किंवा वळवणूक न होता धोरणात्मक स्तरावर घेतलेल्या निर्णयांची यशस्वीपणे अंमलबजावणी होण्याची सुनिश्चिती करणे, हे प्रभावी वित्तीय व्यवस्थापनाचे उद्दिष्ट आहे. हे प्रकरण राज्याच्या विनियोजन लेख्यांच्या लेखापरीक्षणावर आधारित आहे. हे शासनाच्या वाटपाच्या प्राधान्यक्रमांचा आढावा घेते, घटनात्मक तरतुदींच्या विचलनाचा अहवाल देते आणि अर्थसंकल्प तयार करण्यातील पारदर्शकता आणि त्याच्या अंमलबजावणीची परिणामकारकता यांवर परिणाम करणारे मुद्दे अधोरेखित करते. धोरणात्मक पातळीवर घेतलेल्या निर्णयांची प्रशासकीय पातळीवर निधीची वळवणूक न करता अंमलबजावणी होत आहे किंवा कसे, याचाही आढावा घेते.

3.1 अर्थसंकल्प प्रक्रिया

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 202 च्या अनुपालनानुसार प्रत्येक आर्थिक वर्षात त्या वर्षासाठी राज्याच्या अंदाजित जमा व खर्चाचे विवरणपत्र राज्य विधिमंडळासमोर सादर करावयाचे असते ज्याला "वार्षिक वित्तीय विवरणपत्र" (अर्थसंकल्प) असे संबोधले जाते. खर्चाच्या अंदाजपत्रकात खर्चाच्या 'भारित' आणि 'दत्तमत' बाबी[1] स्वतंत्रपणे दर्शविल्या जातात आणि महसुली लेख्यावरील खर्च इतर खर्चापासून वेगळा दर्शविला जातो. राज्य शासनाकडून कोणताही खर्च करण्यापूर्वी वैधानिक प्राधिकार पत्र आवश्यक असते.

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमावली अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके तयार करण्यासाठी आणि खर्चाच्या अधिकृततेशी संबंधित पुढील कार्यवाहीसाठी अवलंबली जाणारी प्रक्रिया प्रस्तावित करते. वित्त विभागाने ठरवून दिलेल्या तारखांना विभागप्रमुखांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या आधारे वित्त विभागाकडून अंदाजपत्रक तयार केले जाते. वित्त विभाग अंदाजपत्रक एकत्रित करतो आणि अर्थसंकल्पीय वर्षासाठी आर्थिक स्थितीचे सारांश विवरण तयार करतो; जमांचा सविस्तर अंदाज व अनुदान मागण्यांचे विवरण तयार करून खर्चाचा सविस्तर अंदाजही तयार करतो. या अंदाजपत्रकात राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या दत्तमत आणि भारित खर्चाचा समावेश असतो. अर्थसंकल्पाशी निगडीत संज्ञांची शब्दावली **परिशिष्ट 3.1** मध्ये देण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय प्रक्रिया सामान्यत: ऑगस्टमध्ये अर्थसंकल्पीय परिपत्रक जारी करण्यापासून सुरू होते, जे विभागांना पुढील आर्थिक वर्षासाठी त्यांच्या अंदाजांची रचना करण्यासाठी मार्गदर्शन करते. राज्यातील अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया **आलेख 3.1** मध्ये दर्शविली आहे.

---

[1] **भारित खर्च:** खर्चाच्या काही निश्चित बाबी (उदाहरणार्थ, सांविधानिक प्राधिकाऱ्यांचे वेतन, कर्ज प्रदाने इत्यादि) राज्याच्या एकत्रित निधीवर भारित असतात आणि हे खर्च विधिमंडळाच्या दत्तमताच्या अधीन नसतात **दत्तमत खर्च:** इतर सर्व खर्च हे विधिमंडळाच्या दत्तमताच्या अधीन असतात

आलेख 3.1: राज्यामधील अर्थसंकल्प तयारीची प्रक्रिया

अर्थसंकल्पीय प्रक्रियेमध्ये विनिर्दिष्ट आहे की विशिष्ट बाबींवरील खर्चासाठी अंदाजपत्रकात तरतूद केलेली रक्कम ही वर्षभरात खर्च करता येण्याएवढी असावी आणि ती जास्त किंवा कमी सुद्धा नसावी. अंदाजपत्रकातील बचत देखील अंदाजपत्रकातील आधिक्याइतकीच वित्तीय अनियमितता दर्शविते. जमांची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके ही कर, शुल्क, फी इत्यादींच्या विद्यमान दरांवर आधारित असावी.

वर्ष 2023-24 दरम्यान मूळ व पुरवणी अर्थसंकल्प, खर्च व बचत यासह राज्य विधिमंडळाने मंजूर केलेली एकूण रक्कम **आलेख 3.2** मध्ये चित्रित केली आहे.

आलेख 3.2: अर्थसंकल्प अंमलबजावणीचा ओघ आलेख



स्त्रोत: 2023-24 चे विनियोजन लेखे

₹ 1,43,923.59 कोटींची निव्वळ बचत ही ₹ 1,43,959.17 कोटींची एकूण बचत वर्षभरात ₹ 35.58 कोटींच्या (13 दत्तमत अनुदाने आणि दोन भारित विनियोजनांमध्ये) जादा खर्चाने भरून निघण्याचा परिणाम आहे. एकूण खर्च (₹ 5,82,296.66 कोटी) मूळ तरतुदीच्या (₹ 6,20,847.10 कोटी) आत असल्याने ₹ 1,05,373.15 कोटींचे पुरवणी अनुदान अतिरिक्त होते. हे अत्याधिक अंदाज आणि अयोग्य आर्थिक व्यवस्थापनाचे द्योतक होते. **परिच्छेद 3.3.1** अन्वये अनावश्यक पुरवणी तरतुदींच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

3.1.1 आर्थिक वर्षातील एकूण तरतूद, प्रत्यक्ष संवितरणे आणि बचतीचा सारांश

299 अनुदाने/विनियोजने यांमध्ये 2023-24 मधील एकूण अर्थसंकल्पीय तरतुदी, प्रत्यक्ष खर्च आणि बचतीची संक्षिप्त स्थिती **तक्ता 3.1** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 3.1: 2023-24 दरम्यान अर्थसंकल्पीय तरतूद, संवितरणे आणि बचत

(₹ कोटीत)

एकूण अर्थसंकल्पीय तरतूद		संवितरणे		बचत	
दत्तमत	भारित	दत्तमत	भारित	दत्तमत	भारित
612734.48	113485.77	490256.43	92040.23	122478.04 (19.99)	21445.54 (18.90)

स्त्रोत: विनियोजन लेखे 2023-24

कंसातील आकडेवारी ही एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीतील बचतीची *टक्केवारी* आहे

3.1.2 भारित आणि दत्तमत संवितरणे

संविधानाच्या अनुच्छेद 112 (2) नुसार वार्षिक वित्तीय विवरणपत्रात समाविष्ट केलेल्या खर्चाच्या अंदाजपत्रकात विधिमंडळाने वर्णन केलेल्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम राज्याच्या एकत्रित निधीवर भारित खर्च म्हणून आणि राज्याच्या एकत्रित निधीतून प्रस्तावित इतर खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेली इतर सर्व रक्कम स्वतंत्रपणे दर्शविली जाईल आणि महसुली लेख्यावरील खर्च इतर खर्चापेक्षा वेगळा दर्शविला जाईल.

मागील पाच वर्षातील (2019-20 ते 2023-24) एकूण भारित आणि दत्तमत संवितरण आणि बचतीचे कल विश्लेषण **तक्ता 3.2** मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता 3.2: 2019-20 ते 2023-24 दरम्यान संवितरण आणि बचत

(₹ कोटीत)

वर्ष	संवितरण		बचत			
	दत्तमत	भारित	दत्तमत	*टक्केवारी*	भारित	*टक्केवारी*
2019-20	328039.77	63443.42	101966.86	31.08	3726.33	5.87
2020-21	320694.58	96353.79	104429.48	32.56	2811.71	2.91
2021-22	370445.46	82405.21	93242.70	25.17	18293.33	22.20
2022-23	444090.50	89983.70	103831.39	18.95	14903.55	14.21
2023-24	490256.43	92040.23	122478.04	19.99	21445.54	18.90
स्त्रोत: संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे						

दत्तमत अनुदानाअंतर्गत संवितरणाच्या *टक्केवारी*तील बचत ही 2019-20 मधील 31.08 *टक्क्यां*वरून 2023-24 मध्ये 19.99 *टक्के* इतक्या लक्षणीय प्रमाणात कमी झाली.

3.1.3 अर्थसंकल्पीय कुशलता (मार्कमनशीप)

प्रत्यक्ष जमा आणि खर्चाच्या तुलनेत महसुली आणि खर्चाचे अर्थसंकल्पीय प्रक्षेपणे यांच्यातील संबंध तपासणे म्हणजे अर्थसंकल्पीय कुशलता होय. जागतिक बँकेचा सार्वजनिक खर्च आणि वित्तीय उत्तरदायित्व एकूण खर्च निष्पत्ती आणि खर्च रचना निष्पत्तीच्या दृष्टीने अर्थसंकल्पाची विश्वासार्हता मोजते.

3.1.3.1 एकूण अर्थसंकल्पीय निष्पत्ती (आऊटटर्न)

एकूण अर्थसंकल्पीय निष्पत्ती हे एकूण अर्थसंकल्पीय खर्चाची निष्पत्ती/प्रत्यक्ष खर्च हे मंजूर रकमेपेक्षा कमी आणि मंजूर रकमेपेक्षा जास्त प्रमाणात मूळ मंजूर रक्कम प्रतिबिंबित करते. 2023-24 या वर्षातील मूळ तरतुदीची सारांशीत स्थिती व प्रत्यक्ष तरतुदीपासून त्याचे विचलन **तक्ता 3.3** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 3.3: मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत प्रत्यक्ष निष्पत्ती

(₹ कोटीत)

तपशील	मूळ मंजूर अर्थसंकल्प	प्रत्यक्ष निष्पत्ती	प्रत्यक्ष आणि मूळ* मधील फरक
(1)	(2)	(3)	(4)=(3-2)
महसुली	474951.93	451673.24	(-) 23278.69
भांडवली	145895.17	130623.42	(-)15271.75
एकूण	**620847.10**	**582296.66**	**(-)38550.44**

*तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष अधिक आकडा (+) म्हणून दर्शविला आहे आणि मूळ तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष कमी आकडा (-) म्हणून दर्शविला आहे.
स्त्रोत: विनियोजन लेखे 2023-24

महसुली विभागात मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत निष्पत्तीमधील विचलन 4.90 *टक्के* होते. हे 110 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के* दरम्यान, 45 अनुदानांमध्ये ±25 ते ±50 *टक्के* दरम्यान, 30 अनुदानांमध्ये ± 50 ते 100 *टक्के* दरम्यान आणि 43 अनुदानांमध्ये 100 *टक्क्यां*च्या बरोबरीने किंवा त्यापेक्षा अधिक विचलन झाल्याने होते.

भांडवली विभागात मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत निष्पत्तीमधील विचलन 10.47 *टक्के* होते. हे 67 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के* दरम्यान, 19 अनुदानांमध्ये ±25 ते ±50 *टक्के* दरम्यान, 18 अनुदानांमध्ये ± 50 *टक्के* ते 100 *टक्के दरम्यान* आणि 20 अनुदानांमध्ये 100 *टक्क्यां*इतके विचलन झाल्याने होते.

3.1.3.2 खर्चाच्या घटकांची निष्पत्ती

खर्चाच्या घटकांची निष्पत्ती ही अंमलबजावणी दरम्यान मुख्य अर्थसंकल्पीय बाबींमधील पुनर्वाटपामुळे खर्चाच्या रचनेत पडलेल्या फरकाचे मोजमाप करते. मूळ तरतुदीची सारांशीत स्थिती व प्रत्यक्ष निष्पत्ती व सुधारित अंदाजपत्रकापासून त्यांचे विचलन **तक्ता 3.4** मध्ये दर्शविले आहे**.**

तक्ता 3.4: सुधारित अंदाजाच्या तुलनेत निष्पत्तीचे विचलन

(₹ कोटीत)

तपशील	मूळ मंजूर अर्थसंकल्प	सुधारित अंदाज	प्रत्यक्ष निष्पत्ती	मूळ मंजूर अर्थसंकल्प आणि सुधारित अंदाज यामधील फरक	प्रत्यक्ष आणि सुधारित* यामधील फरक
1	2	3	4	5	6
महसुली	474951.93	458838.48	451673.24	16113.45	(-)7165.24
भांडवली	145895.17	136076.84	130623.42	9818.33	(-)5453.42
एकूण	**620847.10**	**594915.32**	**582296.66**	**25931.78**	**(-)12618.66**

*सुधारित अंदाजापेक्षा प्रत्यक्ष अधिक (+) आकडा म्हणून दर्शविला जातो आणि मूळ तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष कमी आकडा (-) म्हणून दर्शविला जातो
स्त्रोत: विनियोजन लेखे 2023-24

महसुली विभागात सुधारित अंदाजपत्रकाच्या तुलनेत निष्पत्तीमध्ये 1.56 *टक्के* विचलन होते. हे 175 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के*, 11 अनुदानांमध्ये ±25 ते ±50 *टक्के*, तीन अनुदानांमध्ये ±50 *टक्के* ते 100 *टक्के* आणि सहा अनुदानांमध्ये 100 *टक्क्यां*इतके किंवा त्याहून अधिक विचलन झाल्याने होते.

भांडवली विभागात सुधारित अंदाजपत्रकाच्या तुलनेत निष्पत्तीमध्ये चार *टक्के* विचलन होते. 108 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के*, सहा अनुदानांमध्ये ±25 *ते* ±50 *टक्के,* 20 अनुदानांमध्ये ± 50 *टक्के* ते 100 *टक्के* आणि दोन अनुदानांमध्ये 100 *टक्क्यां*च्या बरोबरीने किंवा त्याहून अधिक विचलन झाल्याने होते.

3.2 विनियोजन लेखे

विनियोजन लेखे राज्य शासनाच्या प्रत्येक वर्षासाठीच्या खर्चाची तुलना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 204 आणि 205 अन्वये पारित केलेल्या विनियोजन अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विविध उद्देशांसाठीची दत्तमत अनुदाने व भारित विनियोजन यांच्या रकमेशी करते. विनियोजन लेखे स्थूल आधारावर असतात. हे लेखे मूळ अर्थसंकल्पीय तरतूद, पुरवणी अनुदाने, प्रत्यार्पण आणि पुनर्विनियोजन स्पष्टपणे दर्शवितात आणि अर्थसंकल्पातील भारित आणि दत्तमत दोन्ही बाबींच्या संदर्भात विनियोजन अधिनियमांतर्गत प्राधिकृत केलेल्या सेवांच्या तुलनेत विविध विशिष्ट सेवांवरील प्रत्यक्ष भांडवली आणि महसुली खर्च दर्शवितात. अशाप्रकारे, विनियोजन लेखे निधीची उपयोगिता, वित्त व्यवस्थापन आणि अर्थसंकल्पीय तरतुदींवरील संनियंत्रण समजून घेणे सुकर करतात आणि म्हणूनच वित्त लेख्यांना पूरक असतात.

प्रत्यक्षात विविध अनुदानांतर्गत झालेला खर्च हा त्या वर्षासाठी विनियोजन अधिनियमानुसार प्राधिकृत केलेल्या खर्चाच्या अनुषंगाने आहे आणि संविधानाच्या (अनुच्छेद 202) प्रावधानांतर्गत आकारण्यात येणारा खर्च आकारला गेला आहे किंवा कसे तपासण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक विनियोजन लेखापरिक्षण करतात. तसेच, ते झालेला खर्च हा कायदे, संबंधित नियम, विनियमन आणि निर्देश यांच्याशी सुसंगत आहे किंवा कसे हे देखील तपासतात.

3.3 अर्थसंकल्पीय आणि लेखा प्रक्रियेच्या सचोटीवर टिप्पण्या

3.3.1 अनावश्यक किंवा अतिरिक्त पुरवणी अनुदाने

पुरवणी अनुदान किंवा विनियोजन म्हणजे मूळ अधिकृत अनुदान किंवा विनियोगात भर घालणे. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकेच्या परिच्छेद 169 आणि 170 सह भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 205 मध्ये पुरवणी अर्थसंकल्प किंवा पुरवणी अंदाजासाठी कायदेशीर आधाराची तरतूद आहे असा अतिरिक्त खर्च अटळ असल्याचे निदर्शनास आल्यास व पुनर्विनियोजन करून जादा रक्कम भरून काढण्यासाठी अनुदानांतर्गत बचतीत बदल करण्याची शक्यता नसल्यास संबंधित विभागाचे सचिव पुरवणी किंवा अतिरिक्त अनुदान किंवा विनियोजनासाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठवितात.

2023-24 वर्षासाठी ₹ 6,20,847.10 कोटींच्या मूळ अंदाजपत्रकाला मंजुरी देण्याबरोबरच राज्य विधिमंडळाने 2023-24 या वर्षासाठी ₹ 1,05,373.15 कोटींच्या पुरवणी तरतुदींना मंजुरी दिली, जी मूळ तरतुदींच्या 16.97 *टक्के* होती.

परिशिष्ट 3.2 मध्ये सविस्तर दर्शविल्याप्रमाणे या अनुदानातील ₹ 1,64,204.75 कोटींचा प्रत्यक्ष खर्च मूळ तरतुदीच्या (₹ 2,02,942.45 कोटी) पातळीपर्यंतही पोहोचला नसल्याने वर्षभरात 44 दत्तमत अनुदानांमध्ये (प्रत्येक प्रकरणात ₹ 10 कोटी किंवा त्याहून अधिक) प्राप्त झालेल्या एकूण ₹ 29,563.05 कोटींच्या पुरवणी तरतुदी अनावश्यक ठरल्या. ₹ 1,000 कोटींपेक्षा अधिक बचत असलेली आणि पुरवणी तरतूद अनावश्यक ठरलेली अनुदाने **तक्ता 3.5** मध्ये दर्शविली आहेत.

तक्ता 3.5: ₹ 1,000 कोटींपेक्षा अधिक बचत झालेली अनुदाने जेथे पुरवणी तरतूद अनावश्यक ठरली

(₹ कोटीत)

अनुदान क्रमांक आणि तपशील	मूळ तरतूद	पुरवणी तरतूद	खर्च	मूळ तरतुदींमधून बचत (*टक्केवारी*)
महसुली विभाग (दत्तमत)				
बी-01 पोलीस प्रशासन	26513.59	321.68	21462.90	5050.69 (19.05)
टी-05 जनजाती क्षेत्र विकास उप-योजनेवरील महसुली खर्च	13101.03	2924.26	10481.65	2619.39 (19.99)
एफ-02 नगर विकास व इतर प्रगत सेवा	16817.61	4318.43	14420.40	2397.20 (14.25)
सी-06 नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी साहाय्य	12273.79	1762.02	10083.94	2189.85 (17.84)
ओ-03 ग्रामीण रोजगार	4142.03	200.00	2255.06	1886.97 (45.56)
एच-05 रस्ते व पूल	8090.41	214.00	6587.32	1503.08 (18.58)
आर-01 वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य	14524.40	2189.05	13297.41	1226.99 (8.45)
सी-07 वने	4003.00	42.61	2943.66	1059.35 (26.46)
झेडए-02 सचिवालय आणि इतर सामाजिक सेवा	3145.97	10.46	2125.77	1020.19 (32.43)
भांडवली विभाग (दत्तमत)				
ओ-10 इतर ग्रामविकासावरील भांडवली खर्च	6346.15	160.00	2313.58	4032.57 (63.54)
एफ-07 शहरी विकासासाठी कर्जे	5502.00	569.28	2416.42	3085.58 (56.08)
आय-05 पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च	16588.08	1528.47	14689.36	1898.71 (11.45)
एल-07 ग्रामीण विकासावरील भांडवली खर्च	5924.98	184.15	4242.14	1682.84 (28.40)
स्त्रोत: 2023-24 चे विनियोजन लेखे				

अशा प्रकारे, असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की ₹ 1,05,373.15 कोटींच्या पुरवणी अनुदानांमुळे अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत बचतीत आणखी वाढ झाली, कारण प्रत्यक्ष खर्च (₹ 5,82,296.66 कोटी) मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा (₹ 6,20,847.10 कोटी) कमी होता.

3.3.2 आकस्मिक निधीमधून अग्रिमे

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 267(2) व 283(2) मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र आकस्मिक निधी अधिनियम 1956 अंतर्गत राज्याचा आकस्मिक निधी निर्माण करण्यात आला आहे. अकल्पित आणि तातडीच्या स्वरुपातील खर्च जे विधिमंडळाची मान्यता प्राप्त होईपर्यंत लांबणीवर टाकणे इष्ट नसते, फक्त ते खर्च भागविण्यासाठीच आकस्मिक निधीमधून अग्रिमे दिली जातात. हा निधी अग्रधन स्वरूपात असतो.

महाराष्ट्र आकस्मिक निधी कायद्यानुसार राज्याच्या आकस्मिक निधीचा साठा ₹ 150 कोटी आहे. 2023-24 या कालावधीत आकस्मिक निधीतून कोणतीही रक्कम आहरीत करण्यात आली नाही.

3.3.3 निधीचे अतिरिक्त किंवा अनावश्यक पुनर्विनियोजन

पुनर्विनियोजन म्हणजे अनुदानातील बचतीची अपेक्षा असलेल्या एका विनियोजनाच्या एका घटकामधील निधी दुसरा घटक जेथे अधिक निधीची आवश्यकता निश्चित केली जाते तेथे हस्तांतरित करणे. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकेच्या परिच्छेद 162 ते 164 नुसार, वित्त विभाग आणि सचिवालयाचा प्रशासकीय विभाग, विनियोजन अधिनियमांतील त्याच अनुदान/विनियोजनांतर्गत मुख्य शीर्ष, गौण शीर्ष अथवा उप-शीर्षामधून इतर समान शीर्षामध्ये पुनर्विनियोजन मंजूर करू शकतात.

लेखापरीक्षण विश्लेषणात असे निदर्शनास आले की पुनर्विनियोजन जास्त प्रमाणात झाले आणि परिणामी 40 उप-शीर्षांतर्गत (प्रत्येक प्रकरणात ₹ 10 कोटी किंवा त्यापेक्षा जास्त) मोठी बचत/अतिरिक्त झाली, ज्याचे तपशील **परिशिष्ट 3.3** मध्ये दिले आहेत. त्या 40 उप-शीर्षांपैकी 11 उप-शीर्षांतर्गत **तक्ता 3.6** मध्ये सविस्तर दर्शविल्याप्रमाणे अंतिम बचत ₹ 100 कोटींपेक्षा जास्त होती.

तक्ता 3.6: अंतिम बचतीकडे (₹ 100 कोटी आणि त्याहून अधिक) नेणारे अनावश्यक पुनर्विनियोजन

(₹ कोटीत)

अनु. क्र.	अनुदान	उप-शीर्ष	तपशील	मूळ	पुरवणी	पुनर्विनियोजन	एकूण	प्रत्यक्ष	बचत
1	ई02	22020119 6 ए017	महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, 1961 च्या कलम 182 अन्वये जिल्हा परिषदांना सहेतुक अनुदान	28541.09	4861.76	18.91	33421.76	32297.34	1124.42
2	बी01	20550010 8 009	शहर पोलिस-आस्थापना	4209.50	93.26	0.54	4303.30	3414.86	888.44

अनु. क्र.	अनुदान	उप-शीर्ष	तपशील	मूळ	पुरवणी	पुनर्विनियोजन	एकूण	प्रत्यक्ष	बचत
3	एन03	222501789 एफ08	भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विभाग योजना	1596.57	0.00	74.77	1671.34	1157.26	514.08
4	आय05	4700-80-190-012	पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च	1198.26	0.00	158.16	1198.26	898.69	299.56
5	ई02	220201106 आय61	समग्र शिक्षा अभियान (सामान्य) (राज्य हिस्सा 40%) (योजना)	874.48	0.00	38.82	913.30	708.14	205.16
6	आय05	4700-80-190-034	पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च	1625.18	0.00	67.84	1625.18	1422.49	202.69
7	एक्स01	223602101 194	अंगणवाडी सेवा (अतिरिक्त राज्य हिस्सा 100%)	438.42	608.99	34.49	1081.90	920.26	161.64
8	आय05	4700-80-190-013	पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च	393.50	0.00	20.08	393.50	243.71	149.79
9	एन03	222501277 334	अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे सुरू करणे व देखभाल करणे (नवीन वसतिगृहे)	400.00	0.00	37.62	437.62	291.84	145.78
10	टी05	22250279 6 डी72	मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे (राज्यस्तरीय योजना)	546.61	0.00	6.03	552.64	408.98	143.66
11	आय05	4700-80-190-010	पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च	490.52	0.00	38.33	490.52	367.26	123.26

स्त्रोत: तपशीलवार विनियोजन लेखे

वरील उदाहरणे अंदाजपत्रक नियंत्रण अधिकारी गरजांचे पुरेसे मूल्यमापन करू शकले नाहीत आणि पुनर्विनियोजन करण्यापूर्वी खर्चाची माहिती अद्ययावत करू शकले नाहीत ह्याचे सूचक आहेत.

3.3.4 अखर्चित रक्कम आणि प्रत्यार्पित विनियोजन आणि/अथवा मोठ्या प्रमाणात बचत/प्रत्यार्पण

सुमार खर्च संनियंत्रण यंत्रणा आणि कमकुवत योजना अंमलबजावणी क्षमता/कमकुवत अंतर्गत नियंत्रणे यावर आधारित अर्थसंकल्पीय तरतूद, आर्थिक वर्षाच्या अखेरीस निधी मुक्त करण्यास प्रोत्साहन देऊन मोठ्या प्रमाणात निधी शासकीय लेख्यांच्या बाहेर बँकांमध्ये राखून ठेवण्याच्या विभागाच्या प्रवृत्तीला उद्धृत करतात. अतिरिक्त बचतीमुळे इतर विभागदेखील वापरता येणाऱ्या निधीपासून वंचित राहतात.

2023-24 दरम्यान ₹ 1,43,923.59 कोटींच्या निव्वळ बचतीपैकी **परिशिष्ट 3.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 66 दत्तमत अनुदानांतील ₹ 94,915.71 कोटी बचत प्रत्येक प्रकरणातील एकूण तरतुदीच्या 20 *टक्के* किंवा त्याहून अधिक होती. तसेच, **परिशिष्ट 3.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 66 पैकी 44 अनुदानांमध्ये प्रत्येक प्रकरणात ₹ 100 कोटींपेक्षा जास्त बचत झाली.

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकेच्या परिच्छेद 173 मध्ये असे नमूद केले आहे की इतर शीर्षाखाली संभाव्य अकल्पित अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी किंवा नवीन खर्च ज्याची सामान्यतः पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद केली जाऊ शकते त्याची पूर्तता करण्यासाठी वितरण किंवा नियंत्रण अधिकाऱ्यांनी बचत राखीव ठेवू नये. सर्व बचत जेव्हा लक्षात येतात तेव्हा त्या तात्काळ प्रत्यार्पित कराव्यात. ज्या तरतुदींचा फायदेशीररित्या उपयोग करता येणार नाहीत त्या प्रत्यार्पित कराव्यात.

2023-24 मध्ये 276 दत्तमत अनुदानांतील एकूण बचतीसह एकूण तरतुदीच्या वापराची *टक्केवारी* **आलेख 3.3** मध्ये दर्शविली आहे.

आलेख 3.3: एकूण बचतीशी बचतीच्या टक्केवारीनुसार गटबद्ध केलेली अनुदाने/विनियोजनांच्या संख्येची विभागणी



(स्त्रोत: 2023-24 चे विनियोजन लेखे)

वरील **आलेख 3.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 276 पैकी 188 अनुदानांनी त्यांच्या वाटपाच्या 70 *टक्क्यांहून* अधिक तर 188 अनुदानांपैकी 121 दत्तमत अनुदानांनी त्यांच्या वाटपाच्या 90 *टक्क्यांहून* अधिक रकमेचा वापर केला होता 2023- 24 मध्ये ₹ 1,43,959.17 कोटींची स्थूल बचत झाली होती. राज्य शासनाने या अनुदानातील निधीच्या अपुऱ्या वापराची कारणे तपासून योग्य ती सुधारात्मक उपाययोजना त्वरित करण्याची आवश्यकता आहे. 2023-24 मधील प्रत्यार्पणाच्या विश्लेषणाचे निरीक्षण पुढील परिच्छेदात मांडले आहे.

अनुदान बी-1-पोलिस प्रशासन-मुख्य शीर्ष 2055-पोलिस-गौण शीर्ष 116-न्यायसहायक विज्ञान, अंतर्गत निर्भया योजनेअंतर्गत मुंबई, महाराष्ट्र येथील जनुकीय घटक (डीएनए) न्यायसहायक प्रयोगशाळेच्या अद्ययावतीकरणासाठी ₹ 11.78 कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद मार्च 2023 मध्ये कोणतेही विशिष्ट कारण न देता प्रत्यार्पण करून मागे घेण्यात आली.

अनुदान डी-9-मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च-मुख्य शीर्ष 4405-मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च गौण शीर्ष 103-सागरी मत्स्यव्यवसाय, अंतर्गत छोट्या मत्स्य बंदराच्या बांधकामासाठीची ₹ 10 कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद कोणतेही विशिष्ट कारण न देता मार्च 2023 मध्ये प्रत्यार्पण करून मागे घेण्यात आली.

अनुदान एल-3-ग्रामीण विकास कार्यक्रम-मुख्य शीर्ष 2235-सामाजिक सुरक्षा आणि कल्याण गौण शीर्ष 103-महिला कल्याण अंतर्गत: अस्मिता कार्यक्रमांतर्गत (राज्य योजना) ग्रामीण भागातील शाळकरी मुलींना सवलतीच्या दरात सॅनिटरी नॅपकिन्स पुरविण्याच्या अनुदानाशी संबंधित हे उप- शीर्ष आहे. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, अस्मिता प्रकल्पावरील 2018-19 ते 2023-24 या कालावधीतील अंदाजपत्रकातील तरतूद आणि खर्चाचा कल हा निधीच्या कमी वापराचा सातत्यपूर्ण नमुना होता. पात्र लाभार्थ्यांची संख्या कमी असल्याने 2018-19 मध्ये ₹ 20 कोटींपैकी केवळ ₹ नऊ कोटी खर्च झाले होते. 2019-20 ते 2021-22 या कालावधीत ही योजना मागील वर्षातील अखर्चित निधीवर अवलंबून असल्याने नवीन खर्च झाला नाही. 2022-23 मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद ₹ 262.39 कोटी होती, परंतु सुधारित अंमलबजावणी आराखड्याला अंतिम स्वरूप देण्यास विलंब झाल्यामुळे संपूर्ण रक्कम वापराविना राहिली. तसेच, 2023-24 मध्ये ₹100 कोटींची तरतूद कोणत्याही नोंदविलेल्या खर्चाशिवाय करण्यात आली आणि बचतीचे कोणतेही विशिष्ट कारण देण्यात आले नाही.

अपेक्षित खर्चाचा अवास्तव अंदाज वर्षानुवर्षे चालू राहिल्याने उप-शीर्षांतर्गत अंतर्गत बचत झाली.

अनुदान एक्स-1 सामाजिक सुरक्षा आणि पोषण- मुख्य शीर्ष 2235-सामाजिक सुरक्षा आणि कल्याण अंतर्गत गौण शीर्ष-103 महिला कल्याण. लेक लाडकी योजनेसाठी पुरवणी मागणीतून ₹ 100 कोटी प्राप्त झाले होते त्यापैकी, मार्च 2024 मध्ये योजनेवरील ₹ 80.30 कोटी प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे प्रत्यार्पित करण्यात आले.

अनुदान झेडसी-3-शासकीय कर्मचाऱ्यांना कर्ज- मुख्य शीर्ष 4216-गृहनिर्माण वरील भांडवली खर्च अंतर्गत-गौण शीर्ष 051-बांधकाम - मनोरा आमदार निवास, मुंबईच्या पुनर्विकासासाठी केलेली ₹ 200 कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद मार्च 2024 मध्ये कोणतेही विशिष्ट कारण न देता प्रत्यार्पित करण्यात आली.

लेखापरीक्षण विश्लेषणातून असे निदर्शनास आले की, 2021-22 आणि 2022-23 या कालावधीत मनोरा आमदार निवास, मुंबईच्या पुनर्विकासासाठी अनुक्रमे ₹ 180.59 कोटी आणि ₹ 200 कोटींची

संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद कोणतेही विशिष्ट कारण न देता आर्थिक वर्षाच्या मार्चमध्ये प्रत्यार्पित करण्यात आली.

अनुदान झेडएच-5 पाटबंधारे वरील भांडवली खर्च- मुख्य शीर्ष 4702-लघु पाटबंधारे वरील भांडवली खर्च अंतर्गत, गौण शीर्ष 101- भूपृष्ठ जल, जुन्या मालगुजारी तलावांची पुनर्रचना व मजबुतीकरणासाठीच्या ₹ 209 कोटी अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी, ₹ 202.48 कोटी या योजनेंतर्गत निधीच्या मागणीचे प्रस्ताव कमी प्राप्त झाल्याने मार्च 2024 मध्ये प्रत्यार्पित करण्यात आले.

3.3.4.1 सातत्यपूर्ण बचती

"सातत्यपूर्ण बचती" म्हणजे दर वर्षी वितरित केलेल्या निधीचा पूर्ण वापर न करण्याची सातत्यपूर्ण प्रथा. मागील पाच वर्षात बचतीमधील सातत्यावरून असे निदर्शनास आले की, विभागांमधील अर्थसंकल्पीय नियंत्रणे प्रभावी नव्हती आणि वर्षाकरिता निधी वितरित करताना मागील वर्षांचे कल विचारात घेतले नव्हते. अनुदानाच्या चाचणी-तपासणीत लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की 42 प्रकरणांमध्ये **(परिशिष्ट 3.6)** गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने ₹ 100 कोटींहून अधिक बचत झाली.

तक्ता 3.7 मध्ये दर्शविल्याप्रमाणे अनुदान ओ-4-इतर ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत 2019-20 ते 2023-24 या कालावधीत 99 ते 100 *टक्के* बचत झाली

तक्ता 3.7: ओ-4 - इतर ग्रामीण विकास कार्यक्रम अंतर्गत सातत्यपूर्ण बचती

(₹ कोटीत)

वर्ष	एकूण अर्थसंकल्पीय तरतूद	प्रत्यक्ष खर्च	बचत	बचतीची कारणे
2019-20	2175.35	-	2175.35	मूळ अंदाजपत्रकात या उपशीर्षाखाली ठेवलेला अंदाजपत्रकात नसलेला खर्च संबंधित प्रशासकीय विभागाला त्यांच्या गरजेनुसार पुरवणी अनुदानाद्वारे वितरित करण्यात आला आणि त्यामुळे ₹ 2175.35 कोटींची संपूर्ण तरतूद लेखांकनाच्या उद्देशाने प्रत्यार्पित करण्यात आली
2020-21	101.12	0.21	100.91	₹ 100.91 कोटींच्या बचतीचे कारण सादर केले नाही (जुलै 2021)
2021-22	100	-	100	मूळ अंदाजपत्रकात या उपशीर्षाखाली ठेवलेला अंदाजपत्रात समाविष्ट नसलेला खर्च संबंधित प्रशासकीय विभागाला त्यांच्या गरजेनुसार पुरवणी अनुदानाद्वारे वितरित करण्यात आला आणि त्यामुळे ₹ 100 कोटींची संपूर्ण तरतूद लेखांकनाच्या उद्देशाने प्रत्यार्पित करण्यात आली
2022-23	100	-	100	
2023-24	100	-	100	
स्रोत: संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे				

काही विभागांनी वास्तविक गरजेपेक्षा खूप जास्त प्रमाणात मागणी करून प्राप्त केलेली अर्थसंकल्पीय तरतूद आणि निधीचा वापर करण्यातील असमर्थता अग्रक्रमित क्षेत्रांना संसाधनांच्या वाटपापासून वंचित ठेवते आणि सार्वजनिक वित्तावर कमजोर वैधानिक नियंत्रणाकडे नेते.

3.3.4.2 'निरंक' खर्च असलेली अनुदाने

2023-24 मध्ये दोन अनुदानांतर्गत करण्यात आलेली ₹10 कोटींहून अधिक असलेली ₹ 502.48 कोटींची अर्थसंकल्पीय तरतुद वर्षअखेरीस अखर्चित राहिली. तपशील **तक्ता 3.8** मध्ये दिले आहेत.

तक्ता 3.8: 'निरंक' खर्च असलेली अनुदाने

(₹ कोटीत)

अनु. क्र	अनुदान	दत्तमत/ भारित	एकूण तरतूद	प्रत्यक्ष खर्च	टिप्पणी
1	बी-12 पूर नियंत्रण प्रकल्पासाठी कर्ज	दत्तमत	28.00	0.00	एशियन विकास बँक साहाय्यित शाश्वत तटीय सुरक्षा आणि व्यवस्थापन गुंतवणूक कार्यक्रम या प्रकल्पासाठी भांडवली खर्च ‘मुख्यशीर्ष 6711-190(00)(01) सार्वजनिक क्षेत्र आणि इतर उपक्रमांसाठी कर्जे ऐवजी मुख्यशीर्ष 2711-190 (00)(03)-सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना मदत' या महसुली खर्चातर्गत नवीन उप-शीर्ष कार्यरत करण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयामुळे अनुदानातील संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली होती.
2	डब्ल्यु-8 इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च	दत्तमत	474.48	0.00	बाल व किशोरवयीन ग्रंथालये व डिजिटल पायाभूत सुविधा योजना भाग VII (₹ 469.38 कोटी) या योजनेसाठी केंद्र शासनाकडून मान्यता न मिळाल्याने, 100 *टक्के* केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत अविकसित जिल्ह्यात नवीन शासकीय तंत्रविद्यानिकेतन (पॉलिटेक्निक) संस्था स्थापन करण्यासाठी (₹ 2.50 कोटी), केंद्र शासनाकडून निधी न मिळाल्याने कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत तंत्रविद्यानिकेतनमध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी वसतिगृह बांधणे (₹ 2.60 कोटी). अनुदानातील संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली
एकूण			**502.48**		
स्त्रोत: 2023-24 चे विनियोजन लेखे					

3.3.5 अतिरिक्त खर्च व त्याचे नियमितीकरण

संविधानाच्या अनुच्छेद 205 (1)(ब) मध्ये अशी तरतूद आहे की, आर्थिक वर्षादरम्यान कोणत्याही सेवेवर त्या सेवेसाठी त्या वर्षी मंजूर केलेल्या रकमेपेक्षा अधिक खर्च झाला असेल तर, राज्यपालांनी अशा अतिरिक्तची मागणी विधिमंडळात सादर करणे आवश्यक आहे. यावरून हे सिद्ध होते की आर्थिक वर्षाकरिता अनुदान/विनियोजनापेक्षा अतिरिक्त खर्च राज्य विधिमंडळाद्वारे नियमित करणे राज्य शासनाला अनिवार्य आहे. अधिक खर्चाच्या नियमितीकरणाबाबत जरी कालमर्यादा निर्धारित केलेली नसली तरी, अतिरिक्त खर्चाचे नियमितीकरण हे लोक लेखा समितीमध्ये विनियोजन लेख्यांवर चर्चा पूर्ण झाल्यावर केले जाते. असे करण्यात आलेले अपयश हे संविधानाच्या तरतुदींचे उल्लंघन

असून आणि जनतेच्या पैशाच्या वापराबद्दल विधिमंडळाच्या कार्यकारिणीचे उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट विफल होते.

3.3.5.1 2023-24 वर्षाशी संबंधित अतिरिक्त खर्च

वर्षभराच्या तरतुदीपेक्षा अधिक खर्च हा केवळ विधिमंडळाच्या मंजुरीसाठी आवश्यक असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करत नाही तर तो चुकीच्या नियोजनाचेही निर्देशक आहे, जो खर्चाच्या प्रगतीचा माग त्या प्रयोजनाकरिता केलेल्या अर्थसंकल्पासोबत घेऊन टाळता येऊ शकतो. तथापि, 2023-24 या वर्षात ₹ 7,26,220.25 कोटी अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत 299 अनुदाने/विनियोजनांमध्ये ₹ 5,82,296.66 कोटी खर्च करण्यात आले. एकूण ₹ 1,43,923.58 कोटींची बचत झाली असली तरी 13 दत्तमत अनुदाने आणि दोन भारित विनियोजनांमध्ये ₹ 35.58 कोटींचा अतिरिक्त खर्च झाला, ज्याचे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 नुसार नियमितीकरण करणे आवश्यक होते.

2023-24 मध्ये तरतुदींपेक्षा अतिरिक्त खर्चासह बंद झालेली अनुदाने/विनियोजने ज्यांना नियमितीकरणाची आवश्यकता आहे ती **तक्ता 3.9** मध्ये दर्शविली आहेत.

तक्ता 3.9: 2023-24 मधील नियमितीकरण आवश्यक असलेली तरतुदींपेक्षा अधिक खर्चासह बंद झालेली अनुदाने/विनियोजने

(₹ कोटीत)

अनु. क्र.	दत्तमत अनुदाने/भारित विनियोजनाचे नाव व शीर्षक	एकूण अनुदान	खर्च	आधिक्य
दत्तमत अनुदान				
1	सी-02 मुद्रांक व नोंदणी	412.17	423.98	11.81
2	ओ-18 जिल्हा योजना-ठाणे	547.67	548.35	0.68
3	ओ-20 जिल्हा योजना-रायगड	253.53	253.63	0.10
4	ओ-38 जिल्हा योजना-धुळे	189.11	190.34	1.23
5	ओ-44 जिल्हा योजना- नंदुरबार	111.42	111.43	0.01
6	ओ-48 जिल्हा योजना- जालना	257.95	257.97	0.02
7	ओ-60 जिल्हा योजना- हिंगोली	167.72	167.72	0.00
8	ओ-70 जिल्हा योजना- गडचिरोली	252.58	258.40	5.82
9	ओ-76 जिल्हा योजना- अकोला	171.64	171.64	0.00
10	ओ-84 जिल्हा योजना-पालघर	198.72	198.87	0.15
11	ओ-19 जिल्हा योजना-ठाणे	202.33	202.38	0.05
12	ओ-47 जिल्हा योजना-छत्रपती संभाजी नगर	166.66	166.67	0.01
13	ओ-75 जिल्हा योजना-अमरावती	122.74	122.75	0.01
भारित खर्च				
14	सी-02 मुद्रांक व नोंदणी	0.00[2]	0.01	0.01
15	टी-01 व्याज प्रदाने	40.36	56.04	15.68
	एकूण	**3094.60**	**3130.18**	**35.58**
स्त्रोत: 2023-24 चे विनियोजन लेखे				

[2] ₹ एक लाखापेक्षा कमी अर्थसंकल्पीय तरतूद

3.3.5.2 मागील आर्थिक वर्षांमधील अतिरिक्त खर्च नियमित करणे

उपरोक्त परिच्छेद 3.3.5 मध्ये नमूद केल्याप्रमाणे, अधिक खर्च वाढीव कालावधीसाठी अनियमित राहिल्यास कार्यकाऱ्यांवरील वैधानिक नियंत्रण सौम्य होते. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 नुसार अनुदान विनियोजनापेक्षा/अधिक खर्च राज्य विधीमंडळाकडून नियमित करून घेणे राज्य शासनाला अनिवार्य आहे. खर्च नियमित करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नसली तरी लोक लेखा समितीकडून विनियोजन लेख्यांवरील चर्चा पूर्ण झाल्यानंतर अधिक खर्चाचे नियमितीकरण केले जाते. 48 अनुदाने व 17 विनियोजनांसंदर्भात वर्ष 2017-18 ते 2022-23 या वर्षांसाठी ₹ 2,990.18 कोटींचा अधिक खर्च मार्च 2024 पर्यंत नियमितीकरणासाठी प्रलंबित होता जे **परिशिष्ट 3.7** मध्ये तपशीलवार दिले आहे.

3.3.6 भांडवली मत्तेच्या निर्मितीसाठी सहाय्यक अनुदाने

सहाय्यक अनुदान म्हणजे एका शासनाने दुसऱ्या शासनाला, संस्थेला किंवा व्यक्तीला केलेली मदत, देणग्या किंवा योगदानाच्या स्वरूपातील प्रदाने होय. मालमत्तेच्या बांधकामासह संस्थेला आधार देण्याच्या विशिष्ट हेतूने सहाय्यक अनुदान दिले जाते.

भारतीय शासकीय लेखांकन मानके 2 नुसार, भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतींनी विशेषत: अधिकृत केलेल्या प्रकरणांचा अपवाद वगळता अनुदानदात्याने अनुदानार्थीस वितरित केलेल्या सहाय्यक अनुदानाचे वर्गीकरण केले जाईल आणि अनुदान म्हणून वितरित निधी अनुदानार्थीने कोणत्या हेतूसाठी खर्च करावयाचा आहे याची पर्वा न करता महसुली खर्च म्हणून वर्गीकृत केला जाईल.

2019-20 ते 2023-24 दरम्यान राज्याने सहाय्यक अनुदानाचे महसुली खर्च म्हणून वर्गीकरण करण्याऐवजी भांडवली खर्च म्हणून केलेल्या चुकीच्या वर्गीकरणाचे प्रमाण **तक्ता 3.10** ठळकपणे दर्शवितो.

तक्ता 3.10: सहाय्यक अनुदानाचे भांडवली खर्च म्हणून केलेले चुकीचे वर्गीकरण

(₹ कोटीत)

	2019-20	2020-21	2021-22	2022-23	2023-24
सहाय्यक अनुदान भांडवली खर्च म्हणून नोंद केले गेले	1580.59	1423.66	1662.63	3440.70	3544.73
एकूण खर्च	338690.64	342638.31	398792.31	473922.42	521898.02
भांडवली खर्च	36415.57	29686.70	46670.39	61643.61	72573.40
भांडवली खर्चामध्ये सहाय्यक अनुदानाच्या हिश्याची *टक्के*वारी	4.34	4.80	3.56	5.58	4.88
जर सहाय्यक अनुदानामधून होणारा खर्च महसुली खर्च मानला गेल्यास महसुली तूट (-)/महसुली अधिक्या (+) वरील परिणाम	1580.59	1423.66	1662.63	3440.70	3544.73
स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे					

3.4 अर्थसंकल्पीय आणि लेखा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर टिप्पण्या

3.4.1 एकरकमी अर्थसंकल्पीय तरतुदी

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, परिशिष्ट X च्या परिच्छेद 53 आणि परिच्छेद 12(ई) मध्ये असे निर्धारित करण्यात आले आहे की मागील तीन वर्षांतील अंदाज व प्रत्यक्ष यांच्यातील तफावतीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पातील तरतुदीची तपासणी करून त्याआधारे प्रस्तावित रक्कम कमी करण्यात यावी. नियम म्हणून एकरकमी अर्थसंकल्प तरतुदी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात प्रस्तावित करू नये. 2023-24 करिता एकरकमी अर्थसंकल्पीय तरतुदी **तक्ता 3.11** मध्ये दर्शविल्या आहेत.

तक्ता 3.11: एकरकमी अर्थसंकल्पीय तरतुदी

(₹ कोटीत)

अनु.क्र.	अनुदान क्रमांक व लेखा शीर्ष	तरतूद	खर्च	टिप्पणी
1	जी-2 2070-800(02)(01)- वेतन व भत्ते इत्यादींसाठी एकरकमी तरतूद.	2500.00	0.00	या शीर्षांतर्गत असलेला बिगर-अर्थसंकल्पीय महसुली खर्च संबंधित प्रशासकीय विभागांना वितरित करण्यात आला आणि त्या विभागाच्या कार्याध्यक्षाकडून कार्यालयीन शीर्षातून खर्च भागविला गेला, म्हणून मार्च 2024 मध्ये संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमावलीच्या परिशिष्ट 10 मधील परिच्छेद 12 (ई) नुसार अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात एकरकमी तरतूद करू नये.
2	ओ-10-4515-800(01)(01)- बिगर- अर्थसंकल्पीय भांडवली खर्चासाठी एकरकमी तरतूद (राज्य योजना)	3041.51	0.00	
3	ओ-04-(2515-800-01-01)- बिगर- अर्थसंकल्पीय महसुली खर्चासाठी एकरकमी तरतूद (राज्य योजना)	100.00	0.00	
स्त्रोत: 2023-24 चे विनियोजन लेखे				

3.4.2 अर्थसंकल्पातील प्रमुख धोरणात्मक घोषणा आणि त्यांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी प्रत्यक्ष निधीचा पुरवठा

2023-24 मध्ये शासनाने अनेक धोरणात्मक उपक्रम/योजना (₹ 10 कोटी व त्याहून अधिक) हाती घेतल्या होत्या. हे धोरणात्मक उपक्रम योजनांची मार्गदर्शक तत्त्वे/कार्यपद्धती मंजूर न होणे, प्रशासकीय मंजुरीअभावी कामे सुरू न होणे, अर्थसंकल्प मुक्त न करणे इत्यादी कारणांमुळे पूर्णपणे किंवा अंशतः कार्यान्वित होऊ शकले नव्हते.

2023-24 च्या वित्त लेख्यांच्या परिशिष्ट XI, खंड II मध्ये वर्षभरात घेतलेले प्रमुख धोरणात्मक निर्णय किंवा अर्थसंकल्पात प्रस्तावित नवीन योजनेचा तपशील देण्यात आला आहे. 2023-24 मध्ये ₹ 21,443.65 कोटींच्या नवीन भांडवली योजना आणि एकूण ₹ 3,665.92 कोटींच्या महसुली योजना सुरू करण्यात आल्या. या नवीन योजनांवर झालेल्या एकूण ₹ 25,109.57 कोटी खर्चापैकी ₹ 24,608.11 कोटी राज्याचा हिस्सा तर ₹ 501.40 कोटी केंद्राचा हिस्सा होता. 2023-24 मध्ये राज्य शासनाने ₹ 100 कोटींपेक्षा जास्त खर्च केलेल्या 29 नवीन योजना/प्रमुख धोरणात्मक घोषणा **परिशिष्ट 3.8** मध्ये तपशीलवार दिल्या आहेत.

3.5 अर्थसंकल्पीय व लेखा प्रक्रियेच्या परिणामकारकतेबद्दल टिप्पण्या

3.5.1 अर्थसंकल्पातील अंदाज आणि प्रक्षेपण व प्रत्यक्ष यांच्यातील तफावत

अवास्तव प्रस्तावांवर आधारित अर्थसंकल्पीय वाटप, खर्चावर संनियंत्रण ठेवणारे कमकुवत कार्यतंत्र आणि कमकुवत योजना अंमलबजावणी क्षमता/कमकुवत अंतर्गत नियंत्रणे याची परिणीती विविध विकासात्मक गरजांकरिता अपुरे इष्टतम वाटप करण्यात होते. काही विभागांतील अतिरिक्त बचतीमुळे इतर विभागांना निधीपासून वंचित रहावे लागते, ज्याचा त्यांना उपयोग करता आला असता.

2023-24 मधील अर्थसंकल्पीय (मूळ/पुरवणी) तरतुदींच्या तुलनेत प्रत्यक्ष खर्चाची सारांशित स्थिती **तक्ता 3.12** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 3.12: 2023-24 दरम्यान अर्थसंकल्पीय (मूळ/पुरवणी) तरतुदीच्या तुलनेत प्रत्यक्ष खर्चाची सारांशित स्थिती

(₹ कोटीत)

	खर्चाचे स्वरूप	मूळ अनुदान/ विनियोजन	पुरवणी अनुदान/ विनियोजन	एकूण	प्रत्यक्ष खर्च	बचत (-)	बचत *(टक्केवारी)*
	(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)
दत्तमत	I महसुली	419488.69	78115.85	497604.54	400494.83	(-)97109.71	19.52
	II भांडवली	83377.49	22500.96	105878.45	84787.45	(-)21091.00	19.92
	III कर्जे आणि अग्रिमे	7904.13	1347.35	9251.48	4974.15	(-)4277.32	46.23
एकूण दत्तमत		**510770.31**	**101964.16**	**612734.47**	**490256.43**	**(-)122478.03**	**19.99**
भारित	IV महसुली	55463.23	1957.37	57420.60	51178.42	(-)6242.18	10.87
	V भांडवली	55.25	12.84	68.09	44.97	(-)23.12	33.96
	VI लोक ऋण	54558.31	1438.78	55997.09	40816.84	(-)15180.25	27.11
एकूण भारित		**110076.79**	**3408.99**	**113485.78**	**92040.23**	**(-)21445.55**	**18.90**
आकस्मिक निधीमध्ये विनियोजन		0.00	0.00	0.00	0.00	0.00	0.00
एकूण		**620847.10**	**105373.15**	**726220.25**	**582296.66**	**(-)143923.59**	**19.82**
स्त्रोत: 2023-24 चे विनियोजन लेखे							

तक्ता 3.12 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 2023-24 मध्ये महाराष्ट्र शासनाने एकूण ₹ 7,26,220.24 कोटी अनुदान व विनियोजनापैकी ₹ 5,82,296.66 कोटी खर्च केल्याने एकूण ₹ 1,43,923.59 कोटीची बचत झाली. ₹ 35.58 कोटीच्या आधिक्यामुळे निव्वळ बचत तितकी कमी झाली. ही बचत वर्षभरात झालेल्या एकूण अनुदान व विनियोजनाच्या 19.82 *टक्के* होती.

प्रधान महालेखाकार (लेखा व अधिदान)-I महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयाने बचत व आधिक्य यांची माहिती खर्चावरील मासिक अहवालाद्वारे नियंत्रण अधिकाऱ्यांना नियमितपणे दिली होती. मार्च 2024 मध्ये प्राथमिक आणि अंतिम लेखे बंद झाल्यानंतर देखील त्यांनी संबंधित विभागांकडे ही बाब

उचलून धरली होती आणि नियंत्रण अधिकाऱ्यांना लक्षणीय तफावतीच्या कारणांच्या स्पष्टीकरणाबद्दल विनंती केली होती परंतु काहीही स्पष्टीकरण प्राप्त झाले नाही (जून 2024).

2019-20 ते 2023-24 या पाच वर्षांच्या कालावधीत अर्थसंकल्पाच्या उपयोगितेचे प्रमाण **आलेख 3.4** मध्ये दर्शविले आहे.

आलेख 3.4: 2019-20 ते 2023-24 दरम्यान अर्थसंकल्प उपयोगिता



स्त्रोत: संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे

आलेख 3.4 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 2022-23 मध्ये अर्थसंकल्पाचा 80 *टक्क्यां*पेक्षा जास्त वापर झाला. 2023-24 मध्ये 80 *टक्के* अर्थसंकल्पीय तरतुदीचा वापर झाला. वाटप केलेल्या निधीतील मोठ्या प्रमाणातील बचत हे संसाधन एकत्रीकरणाच्या चुकीच्या निर्धारणेसहित सदोष अंदाजपत्रक दर्शविते.

2019-20 ते 2023-24 दरम्यान मूळ अंदाजपत्रक, सुधारित अंदाजपत्रक, प्रत्यक्ष खर्च यांचा कल **तक्ता 3.13** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

तक्ता 3.13: मूळ अंदाजपत्रक, सुधारित अंदाज व प्रत्यक्ष खर्च

(₹ कोटीत)

	2019-20	2020-21	2021-22	2022-23	2023-24
मूळ अर्थसंकल्प	431554.81	452136.69	503688.31	568270.63	620847.10
पुरवणी अर्थसंकल्प	65621.57	72152.87	60698.39	84538.52	105373.15
एकूण अर्थसंकल्प	497176.38	524289.56	564386.70	652809.15	726220.25
सुधारित अंदाज	416921.35	437390.51	496637.96	581268.25	656495.09
प्रत्यक्ष खर्च	391483.19	417048.36	452850.67	534074.20	582296.66
बचत(-)	(-)105693.19	(-)107241.20	(-)111536.03	(-)118734.95	(-)143923.59

	2019-20	2020-21	2021-22	2022-23	2023-24
मूळ तरतुदीशी पुरवणी (*टक्क्यांत*)	15.21	15.96	12.05	14.88	16.97
एकूण तरतुदीशी एकूण बचत (*टक्क्यांत*)	21.26	20.45	19.76	18.19	19.82
एकूण अर्थसंकल्प- सुधारित अंदाज	80255.03	86899.05	67748.74	71540.90	69725.16
सुधारित अंदाज - प्रत्यक्ष खर्च	25438.16	20342.15	43787.29	47194.05	74198.43
एकूण अर्थसंकल्प-सुधारित अंदाज यांची एकूण अर्थसंकल्पाशी *टक्के*वारी (*टक्क्यांत*)	16.14	16.57	12.00	10.96	9.60
सुधारित अंदाज - प्रत्यक्ष खर्च यांची एकूण अर्थसंकल्पाशी *टक्के*वारी (*टक्क्यांत*)	5.12	3.88	7.76	7.23	10.22
स्त्रोत: संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे					

वरील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे, 2023-24 मध्ये ₹ 1,05,373.15 कोटी पुरवणी तरतूद मूळ तरतुदीच्या 16.97 *टक्के* होती, जी मागील वर्षी (2022-23) 14.88 *टक्के* होती. गेल्या पाच वर्षांतील अर्थसंकल्पीय बचत 18 ते 22 *टक्क्यां*पर्यंत होती.

आलेख 3.5: 2019-20 ते 2023-24 दरम्यानचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, सुधारित अंदाजपत्रक आणि प्रत्यक्ष यांचा कल दर्शवितो



स्त्रोत: संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे

आलेख 3.5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 2019-20 ते 2023-24 या कालावधीत सुधारित अंदाजपत्रक राज्याच्या एकूण अर्थसंकल्पापेक्षा नेहमीच कमी होते. 2019-20 ते 2023-24 या कालावधीतील पुरवणी तरतुदी अनावश्यक ठरल्या कारण खर्च मूळ अर्थसंकल्पीय तरतुदींच्या पातळीपर्यंतही पोहोचला नाही.

3.5.1.1 अर्थसंकल्पातील तफावतीचे अपूर्ण स्पष्टीकरण/स्पष्टीकरणाचा अभाव

मंजूर अर्थसंकल्पाच्या तुलनेत खर्च दर्शविण्याव्यतिरिक्त, विनियोजन लेखे अशा प्रकरणांसाठी स्पष्टीकरण देखील देतात जिथे खर्च अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा (मूळ *अधिक* पुरवणी) लक्षणीय प्रमाणात बदलतो. उप-शीर्ष/विनियोजन घटक या स्तरावरील अश्या तफावतीचे स्पष्टीकरण विनियोजन लेख्यांमध्ये कोणत्या मर्यादेच्या पलीकडे द्यायचे हे लोक लेखा समितीने निर्धारित केले आहे.

प्रधान महालेखापाल (लेखा व अधिदान) विभागांच्या नियंत्रण अधिकाऱ्यांना विनियोजन लेख्यांचा मसुदा प्रदान करतात आणि लोक लेखा समितीने निर्धारित केलेल्या मर्यादेनुसार मंजूर अर्थसंकल्पीय वाटपाच्या संदर्भात खर्चातील तफावतीची कारणे/स्पष्टीकरणे मागवतात.

महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या लोक लेखा समितीने (चौदावी विधानसभा) 2021-22 च्या आपल्या पहिल्या अहवालात या खात्यांमध्ये बचत आणि आधिक्य याबाबत नोंदी आणि टिप्पण्या करण्यासाठी खालील निकष सुचवले आहेत.

बचती	(अ) एकंदर बचत:- अनुदान/विनियोजनाची एकूण बचत त्याअंतर्गत केलेल्या एकूण तरतुदीच्या पाच टक्क्यांपेक्षा कमी असेल तर वैयक्तिक उप-शीर्षांतर्गत बचतीबाबत कोणत्याही नोंदी किंवा टिप्पण्या आवश्यक नाहीत. (ब) वैयक्तिक उप-शीर्ष:- उप-शीर्षाखालील बचत ₹ 100 लाख किंवा उप-शीर्षाखालील एकूण तरतुदीच्या 10 *टक्के*, यापैकी जी जास्त असेल ती असल्यास त्यावर टिप्पण्या येतील.
आधिक्य	(अ) सर्व अतिरिक्त खर्च लोक लेखा समितीच्या शिफारशींनुसार विधानसभेने (भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 204 व 205 अन्वये) नियमित करणे आवश्यक आहे. (ब) उप-शीर्षाखालील आधिक्याची रक्कम ₹ 50 लाख किंवा उप-शीर्षाखालील एकूण तरतुदीच्या 10 *टक्के*, यापैकी जी कमी असेल ती असल्यास त्यावर भाष्य केले जाते. मात्र, तरतुदीपेक्षा जास्त रकमेची *टक्के*वारी कितीही असली तरी ₹ 50 लाखांपेक्षा कमी आधिक्य असल्यास त्यावर भाष्य करण्याची गरज नाही.

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमावलीच्या परिच्छेद 165 नुसार, काही विशिष्ट किंवा असामान्य वैशिष्ट्ये असलेल्या निधीच्या पुनर्विनियोजनास मान्यता देण्याच्या आदेशात त्यांच्यामुळे बाधित झालेल्या उप-शीर्षांतर्गत भर आणि कपातीची कारणे थोडक्यात नमूद करावीत. तथापि, वित्त विभागाने जारी केलेल्या पुनर्विनियोजन आदेशांची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, विनियोजन खात्यांमध्ये नमूद केलेल्या 2,401 बाबींपैकी 456 (19 *टक्के*) बाबींच्या संदर्भात अतिरिक्त तरतुदी/तरतूद मागे घेण्याची कोणतीही कारणे नमूद केली नव्हती. हे राजकोषीय उत्तरदायित्व आणि

अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमाच्या कलम 6 मध्ये नमूद पारदर्शकतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे.

3.5.2 अर्थसंकल्पीय ओघ आणि अनुदानाचा आढावा

3.5.2.1 खर्चाची घाई

योग्य अर्थसंकल्पीय नियंत्रणासाठी वर्षभरातील खर्चाचा एकसमान ओघ ही प्राथमिक गरज आहे. मुंबई वित्तीय नियम 1959, नुसार आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात खर्चाची घाई टाळावी. नियमातील तरतुदीच्या विरुद्ध, **तक्ता 3.14** मध्ये नमूद केलेल्या 12 अनुदानांत मार्च 2024 मध्ये ₹ 100 कोटीहून अधिक असलेला एकूण अनुदानाच्या 75 टक्के खर्च झाला.

तक्ता 3.14: मार्च 2024 मधील खर्चाचा ओघ

(₹ कोटींत)

अनु. क्र.	अनुदान क्र.	अनुदान तपशील	2023-24 मध्ये अनुदानाअंतर्गत एकूण खर्च	मार्च 2024 मध्ये झालेला खर्च	एकूण खर्चाच्या संदर्भात मार्चमधील खर्चाची *टक्केवारी*
1.	ओ15	जिल्हा योजना- मुंबई शहर	112.21	134.39[3]	119.78
2.	बी07	आर्थिक सेवा	1149.23	1126.73	98.04
3.	ओ09	जनगणना, सर्वेक्षण आणि सांख्यिकी	2076.05	2011.69	96.90
4.	ओ50	जिल्हा योजना - परभणी	231.18	200.28	86.63
5.	ओ17	जिल्हा योजना - मुंबई उपनगर	134.07	113.15	84.40
6.	झेडई01	अल्पसंख्यांक विकास'	876.27	733.25	83.68
7.	ओ55	जिल्हा योजना - बीड	124.01	103.72	83.63
8.	के06	ऊर्जा	12034.58	9346.79	77.67
9.	एफ05	सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च	8051	6117.26	75.98
10.	बी10	आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च	3247.80	2461.31	75.78
11.	यू04	पारिस्थितिकी आणि पर्यावरण	287.99	216.16	75.06
12.	ओ02	सामाजिक सुरक्षा आणि कल्याण	220.74	165.29	74.88
स्त्रोत: मार्च 2024 चे मासिक नागरी लेखे					

परिशिष्ट 3.9 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 101 अनुदानांच्या संदर्भात ('व्याज प्रदाने' वगळून) चौथ्या तिमाहीत ₹ 100 कोटींहून अधिक खर्च झाला आणि हा खर्च त्या अनुदानातील एकूण खर्चाच्या 50 ते 100 *टक्के* दरम्यान होता.

मार्च 2024 मध्ये खर्चाची *टक्केवारी* जास्त असलेल्या गृह विभागातील अनुदान बी 7- 'आर्थिक सेवां'चा महिना-निहाय खर्च **आलेख 3.6** मध्ये दर्शविला आहे.

---

[3] अनुदान 0-15 'जिल्हा योजना- मुंबई शहर' संदर्भात, मुख्य शीर्ष 4210 अंतर्गत 'गौण शीर्ष 911- ज्यादा प्रदानांसाठी वसुली' हे उपलब्ध नसल्याने, 2 ऱ्या तिमाहीत (-) ₹ 35.18 कोटींचा ऋण खर्च दाखविण्यात आला. त्यामुळे मार्च महिन्यातील खर्च एकूण खर्चापेक्षा अधिक दिसत आहे

स्त्रोत: मासिक नागरी लेखे 2023-24

अनुदान बी-7 अंतर्गत एकूण ₹ 1149.23 कोटी खर्चापैकी 98.04 *टक्के* (₹ 1,126.73 कोटी) खर्च मार्च 2024 मध्ये झाल्याचे निदर्शनास आले. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात होणारा प्रचंड खर्च विवेकी आर्थिक व्यवस्थापनाशी विसंगत आहे आणि कमकुवत अंतर्गत नियंत्रण प्रणाली आणि अर्थसंकल्पीय नियंत्रण/व्यवस्थापनाचा अभाव दर्शवितो.

3.5.2.2 जमा व खर्चाचा ओघ

शासकीय निधी वर्षभर एकसमानतेने खर्च व्हायला हवा. आर्थिक वर्षाच्या अखेरीस खर्चाची घाई ही आर्थिक औचित्याचा भंग मानली जाते.

मुंबई वित्तीय नियम 1959, नुसार आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात खर्चाची घाई टाळणे आवश्यक आहे. 2023-24 मध्ये राज्याच्या तिजोरीत जमांचा मासिक ओघ आणि वितरण **आलेख 3.7** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 3.7: 2023-24 मध्ये मासिक जमा आणि खर्च

(₹ कोटीत)



	एप्रिल-23	मे-23	जून-23	जुलै-23	ऑगस्ट-23	सप्टें.-23	ऑक्टो.-23	नोव्हें-23	डिसें.-23	जाने.-24	फेब्रु.-24	मार्च-24
जमा	33979	41401	43610	38049	32972	41696	37473	47966	39918	41455	65661	93146
खर्च	22893	22797	37725	36045	42181	40258	43672	36308	42032	42389	54925	141490

स्त्रोत: मासिक नागरी लेखे 2023-24

आलेख 3.7 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2023-24 मध्ये एप्रिल, मे, जून, जुलै, सप्टेंबर, नोव्हेंबर व फेब्रुवारी या महिन्यांत खर्चाच्या तुलनेत जमा अधिक होत्या. तथापि, वर्षाच्या उर्वरित महिन्यांच्या तुलनेत मार्च 2024 मध्ये जमा आणि खर्च या दोन्हींमध्ये लक्षणीय वाढ झाली. तसेच, 2023-24 मधील खर्चाच्या स्वरूपाची छाननी केली असता असे निदर्शनास आले की, राज्य शासनाने केवळ मार्च 2024 मध्ये ₹ 1,41,489.70 कोटींचा केलेला खर्च हा ₹ 5,62,714.85 कोटींच्या एकूण खर्चाच्या 25.14 *टक्के* होता.

3.5.3 निवडलेल्या अनुदानांचे पुनर्विलोकन/आढावा

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका 1959 मध्ये अशी तरतूद आहे की, अनुदान प्रशासित करणाऱ्या प्राधिकाऱ्यांवर त्यांच्या नियंत्रणाखालील/अखत्यारीतील खर्चाच्या प्रगतीवर नजर ठेवण्याची तसेच खर्च मंजूर अनुदानांतर्गत किंवा विनियोजनांतर्गत राखण्याची जबाबदारी असते . अंदाजपत्रक वेळेवर आणि अचूकपणे तयार करणे तसेच त्यांच्या ताब्यात असलेले अनुदान त्याच बाबींवर खर्च केले ज्यासाठी त्यांची तरतूद केली होती हे सुनिश्चित करणे आणि आवश्यकता नसल्यास बचत प्रत्यार्पित करणे या बाबी प्राधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांमध्ये अंतर्भूत असतात.

निवडलेल्या दोन अनुदानांच्या संदर्भात म्हणजेच अनुदान झेडई-01 अल्पसंख्यांक विकास आणि अनुदान सी-01 महसूल आणि जिल्हा प्रशासन यांची अर्थसंकल्पीय कार्यपद्धती व खर्चावरील नियंत्रणाचा आढावा घेण्यात आला. ज्यामध्ये मूळ अनुदान, पुरवणी मागण्या आणि प्रत्यक्ष खर्च यामधील तफावतीच्या परिमाणाचे विश्लेषण करण्यात आले.

प्राधिकारी ह्या सूचनांचे कितपत पालन करीत आहेत हे तपासण्याच्या दृष्टीने लेखापरीक्षणाने 2020- 21 ते 2023-24 या कालावधीसाठी प्रशासकीय विभागाच्या/नियंत्रण अधिकारी यांच्या खालील अनुदानांच्या अभिलेख्यांची चाचणी-तपासणी केली.

लेखापरीक्षण परिच्छेद पुढील परिच्छेदात आहेत.

3.5.3.1 अनुदान सी-01 - महसूल आणि जिल्हा प्रशासन

(i) प्रस्तावना

या अनुदानांतर्गत आयुक्त कार्यालयाच्या संचालन व प्रशासनावरील महसुली खर्चासाठी तसेच राष्ट्रीय भूमी अभिलेख्यांच्या आधुनिकीकरण कार्यक्रमासाठी तरतूद केली जाते. हे खर्च 2029-जमीन महसूल, 2045-वस्तू आणि सेवांवरील इतर कर आणि शुल्के, 2053-जिल्हा प्रशासन, 2070-इतर प्रशासकीय सेवा आणि 2853-अलोह खाण आणि धातुकर्म उद्योग या पाच मुख्यशीर्षांमध्ये अंतर्भूत आहेत.

(ii) अर्थसंकल्प आणि खर्च

2021-22 ते 2023-24 दरम्यान या अनुदानांतर्गत एकूण अर्थसंकल्पीय तरतूद, प्रत्यक्ष खर्च आणि बचत **तक्ता 3.15** मध्ये दर्शविले आहे

तक्ता 3.15 अनुदान क्र. सी-01 अंतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदी, प्रत्यक्ष खर्च व बचत यांचा तपशील.

(₹ कोटीत)

वर्ष	मूळ तरतूद	पुरवणी तरतूद	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	बचत	बचतीची टक्केवारी
2021-22	2928.39	50.42	2978.81	2437.05	541.76	18.18
2022-23	3148.50	61.02	3209.52	2781.27	428.25	13.34
2023-24	3440.51	700.93	4141.45	3072.94	1068.51	25.80
स्त्रोत: संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे						

तक्ता 3.15 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2021-22 ते 2023-24 दरम्यान अनुदान सी-01 (दत्तमत) अंतर्गत 13.34 टक्के ते 25.80 *टक्के* दरम्यान बचत दर्शविली आहे. 2021-22 ते 2023-24 या तीन वर्षांत प्रत्यक्ष खर्च मूळ तरतुदीच्या पातळीपर्यंत न पोहोचल्याने पुरवणी तरतुदी अनावश्यक ठरल्या.

(iii) संपूर्ण तरतुदीचे प्रत्यार्पण

2023-24 च्या विनियोजन लेख्यांची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, अनुदान सी- 01 अंतर्गत दोन उप-शीर्षांखालील ₹ 2.84 कोटींची संपूर्ण तरतूद **तक्ता 3.16** मध्ये दर्शविल्याप्रमाणे मार्च 2024 मध्ये प्रत्यार्पित करण्यात आली**.**

तक्ता 3.16 अनुदान सी-01 अंतर्गत संपूर्ण तरतुदीचे प्रत्यार्पण दर्शविणारा तपशील

(₹ कोटीत)

अनु. क्र.	तपशील	मूळ व पुरवणी अनुदान	पुनर्विनियोजित रक्कम	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च
1	2029-102-(00)(06) राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम 50 *टक्के* केंद्रीय पुरस्कृत योजना (50 *टक्के* राज्य हिस्सा)	1.42	0	1.42	0
जिल्ह्यामध्ये स्कॅनिंगचे काम पूर्ण झालेले असूनही प्रदान देयके प्राप्त झाली नव्हती. परिणामी, उप-शीर्षाची ₹ 1.42 कोटीची संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली.					
2	2029-102-(00)(08) सर्वेक्षण व जमाबंदी परिचालन (सेटलमेंट ऑपरेशन्स)- जमाबंदी आयुक्त आणि संचालक, राष्ट्रीय भूमी अभिलेख- राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम 50 *टक्के* केंद्र पुरस्कृत योजना (50 *टक्के* राज्य हिस्सा)	1.42	0	1.42	0
केंद्र शासनाकडून आधुनिक अभिलेखे कार्यालयास पुनर्सर्वेक्षणासाठी निधी प्राप्त झाल्यामुळे, उपरोक्त उप-शीर्षातर्गत असलेली संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली.					
स्त्रोत: विनियोजन लेखे 2023-24					

(iv) उप-शीर्षांतर्गत लक्षणीय बचत

परिशिष्ट 3.10 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2023-24 मध्ये अनुदान क्रमांक सी-01 अंतर्गत 17 उप- शीर्षांतर्गत ₹ 10 कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आणि एकूण तरतुदीच्या 11.28 *टक्के* ते 88.90 *टक्के* बचत दिसून आली. **तक्ता 3.17** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 18 पैकी चार उप-शीर्षांनी प्रत्येक प्रकरणात ₹ 50 कोटींहून अधिक बचत नोंदविली.

तक्ता 3.17: अनुदान सी-01 अंतर्गत उप-शीर्षनिहाय लक्षणीय बचत

(₹ कोटीत)

अनु. क्र.	संगणक सांकेतांक	तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष	बचत	बचतीची टक्केवारी
1	2029-103-(02)(01)	संचालक, भूमी अभिलेख	494.78	435.38	59.40	12.00
2	2053-(093)-(01)(01)	आयुक्त, कोंकण	195.47	141.67	53.80	27.51
3	2053-094-(03)(03)	आयुक्त, पुणे	261.60	209.84	51.76	19.79
वरील तीन उप-शीर्षांमध्ये वित्त विभागाने खर्चावर घातलेली बंधने, सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचा दुसरा हप्ता भरणा लांबणीवर टाकणे आणि रिक्त पदे न भरल्याने निधी प्रत्यार्पित करण्यात आला.						
4	2853-102-(00)(01)	वाळूचे उत्खनन, साठवणूक व वाहतूक इत्यादींसाठी होणारा खर्च	488.91	54.26	434.65	88.90
वरील उप-शीर्षांतर्गत पुरवणी तरतुदीद्वारे ₹ 488.90 कोटी तरतूद प्राप्त झाली होती, त्यापैकी, ₹ 434.64 कोटी नियंत्रण अधिकाऱ्यांकडून निधीची मागणी न झाल्याने प्रत्यार्पित करण्यात आले. स्त्रोत: विनियोजन लेखे 2023-24						

3.5.3.2 अनुदान झेडई -01 अल्पसंख्यांक विकास विभाग (दत्तमत)

(i) प्रस्तावना

या अनुदानांतर्गत अल्पसंख्याक विकासाशी संबंधित योजनांवरील महसुली खर्चाची तरतूद केली जाते, ज्यात (2052) सचिवालय - साधारण सेवा, (2053) जिल्हा प्रशासन, (2075) संकीर्ण साधारण सेवा, (2205) कला आणि संस्कृती (2235) सामाजिक सुरक्षा व कल्याण आणि (2406) वनीकरण आणि वन्यजीव या सहा मुख्यशीर्षांचा समावेश आहे.

(ii) अर्थसंकल्प आणि खर्च

2020-21 ते 2023-24 या वर्षांसाठी अनुदानांतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदी, प्रत्यक्ष खर्च आणि बचतीची एकूण स्थिती **तक्ता 3.18** मध्ये दर्शविली आहे**.**

तक्ता 3.18: अनुदान क्रमांक: झेडई 01 अंतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदी व प्रत्यक्ष खर्चाचा तपशील

(₹ कोटीत)

वर्ष	मूळ तरतूद	पुरवणी तरतूद	एकूण अनुदान/ विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	बचत	बचतीची टक्केवारी
झेडई 01 अल्पसंख्याक विकास						
2020-21	612.03	0.15	612.18	196.98	415.20	67.82
2021-22	665.35	200.00	865.35	510.27	355.08	41.03
2022-23	784.28	0.20	784.48	406.64	377.84	48.16
2023-24	851.19	510.00	1361.19	876.27	484.92	35.62
स्त्रोत: संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे						

वरील तक्त्यावरून 2020-21 ते 2023-24 दरम्यान अनुदान क्र. झेडई -01 अंतर्गत 35.62 *टक्के* ते 67.82 *टक्के* दरम्यान सातत्याने बचत झाल्याचे स्पष्ट झाले.

(iii) उप-शीर्षांतर्गत लक्षणीय बचत

वर्ष 2023-24 मध्ये अनुदान क्र. झेडई-01 अंतर्गत सहा उप-शीर्षांमध्ये एकूण तरतुदीच्या 38.25 *टक्के* ते 95.14 *टक्क्यांच्या* दरम्यान असलेली ₹ 10 कोटी किंवा त्याहून अधिक बचत दिसून आली, जी होती जी **तक्ता 3.19** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 3.19 : अनुदान झेडई-01 अंतर्गत उप-शीर्षनिहाय लक्षणीय बचत

(₹ कोटीत)

अनु क्र.	संगणक सांकेतांक	तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष	बचत	*टक्केवारी*
झेडई 01-अल्पसंख्यांक विकास विभाग (दत्तमत)						
1	2235-200(01)(14)	प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम (राज्य हिस्सा)	80.00	3.89	76.11	95.14
मार्च 2024 मध्ये ₹ 76.11 कोटी तरतुदीचे प्रत्यार्पण करण्याचा संबंध दुस-या टप्प्याचे पूर्ण प्रस्ताव प्राप्त न झाल्याने आणि या योजनेंतर्गत जिल्ह्यांकडून नवीन प्रस्ताव प्राप्त न झाल्याशी जोडण्यात आला.						

अनु क्र.	संगणक सांकेतांक	तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष	बचत	टक्केवारी
2	2235-200(00)(16)	अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी अस्तित्वात असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी आणि तिसरी पाळी सुरू करणे	59.94	20.36	39.58	66.03
मार्च 2024 मध्ये ₹ 39.46 कोटी तरतूद प्रत्यार्पण करण्याचा संबंध या योजनेंतर्गत प्रस्ताव प्राप्त न होण्याशी जोडण्यात आला.						
3	2235-200(01)(21)	अल्पसंख्यांक शाळांना मूलभूत पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सहाय्यक अनुदान	20.00	3.74	16.26	81.30
मार्च 2024 मध्ये ₹ 16.26 कोटी तरतूद प्रत्यार्पण करण्याचा संबंध या योजनेंतर्गत प्रस्ताव प्राप्त न होण्याशी जोडण्यात आला.						
4	2235-200(01)(08)	शहरातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या वसतिगृहासाठी सहाय्यक अनुदान	21.76	2.92	18.84	86.58
मार्च 2024 मध्ये ₹ 18.84 कोटींची तरतूद प्रत्यार्पण करण्याचा संबंध अहिल्यानगर येथील वसतिगृहाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाचा प्रशासकीय मान्यतेनुसार आढावा घेण्याशी जोडण्यात आला.						
5	2235-200(00)(15)	अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी नवीन तंत्रविद्यानिकेतन सुरू करण्यासाठी सहाय्यक अनुदान	20.00	4.00	16.00	80.00
मार्च 2024 मध्ये ₹ 16 कोटी तरतुदीचे प्रत्यार्पण करण्याचा संबंध वित्त विभागाच्या दिनांक 27 मार्चच्या परिपत्रकाद्वारे उर्वरित निधी वाटप थेट लाभ हस्तांतरणाद्वारे करण्याचा प्रस्ताव नियोजन विभागाने नाकारण्याशी लावला.						
6	2235-200(01)(3)	अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी सध्याच्या शासकीय तंत्रविद्यानिकेतनमध्ये दुसरी पाळी सुरू करणे	29.25	18.06	11.19	38.26
मार्च 2024 मध्ये ₹ 11.19 कोटींची तरतूद प्रत्यार्पण करण्याचा संबंध या योजनेंतर्गत पुरवठादारांच्या प्रशासकीय मान्यतेनुसार विद्यमान 14 तंत्रविद्यानिकेतनसाठी मागणी केलेल्या संगणकांचा पुरवठा पुरवठादारांनी न करण्याशी जोडण्यात आला.						
स्त्रोत: 2023-24 चे विनियोजन लेखे						

(iv) संपूर्ण तरतुदीचे प्रत्यार्पण

अनुदान क्र. झेडई-1 अंतर्गत खालील सहा लेखाशीर्षाखाली ₹ 217.58 कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद. 2023-24 च्या अखेरीस विनावापर पडून होती. योजना-निहाय तपशील **तक्ता 3.20** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 3.20: अनुदान क्र. झेडई-01 अंतर्गत संपूर्ण तरतुदीचे प्रत्यार्पण दर्शविणारा तपशील

(₹ कोटीत)

अ. क्र.	तपशील	मूळ व पुरवणी अनुदान	पुनर्विनियोजित रक्कम	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	प्रत्यार्पणाचे कारण
झेडई -01 - अल्पसंख्यांक विकास						
1	2235-200(00)(17) अल्पसंख्यांक बहुल भागासाठी प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम-केंद्र पुरस्कृत योजना (केंद्राचा हिस्सा)	120.00	120.00	0.00	0.00	मार्च 2024 मध्ये ₹ 130 कोटींची संपूर्ण तरतूद कोणतेही विशिष्ट कारण न देता प्रत्यार्पित करण्यात आली.
2	2235-200(00)(20) अल्पसंख्याकांसाठी धर्मक्षेत्र व परिसर विकास योजना	10.00	10.00	0.00	0.00	
3	2235-200(01)(09) अल्पसंख्याकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहाय्यक अनुदान	60.00	60.00	0.00	0.00	मार्च 2024 मध्ये ₹ 60 कोटींची संपूर्ण तरतूद या योजनेअंतर्गत निधीची मागणी न आल्याने प्रत्यर्पित करण्यात आली.
4	2235-200(01)(06) अल्पसंख्यांक बहुल भागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदानाकरिता सहाय्यक अनुदान	12.58	12.58	0.00	0.00	मुंब्रा-कौसा आणि मांडवी येथे वर्षभरात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या बांधकामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने मार्च 2024 मध्ये ₹ 12.58 कोटींची संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली.
5	2235-200(01)(19) हज समितीला सहाय्यक अनुदान	10.00	10.00	0.00	0.00	नागपूर येथील हज हाऊसच्या सुशोभीकरणासाठी व सरकता जिना बसविण्यासाठी वित्त विभागाने निधी मुक्त न केल्याने मार्च 2024 मध्ये ₹ 10 कोटींची संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली.
6	2235-200(01)(01) मोफत प्रशिक्षण व संलग्न योजनेसाठी अनुदान	5.00	5.00	0.00	0.00	मार्च 2024 मध्ये ₹ पाच कोटींची संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्याचा संबंध वर्षभरात या योजनेची अंमलबजावणी न होण्याशी जोडण्यात आला.

स्त्रोत: विनियोजन लेखे 2023-24

3.6 निष्कर्ष

- 2023-24 मध्ये महाराष्ट्र शासनाची अर्थसंकल्पीय गृहीतके अवास्तव आणि अवाजवी होती, कारण राज्य शासनाने 299 अनुदाने/विनियोजनांमध्ये एकूण ₹ 7,26,220.25 कोटी अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत ₹ 5,82,296.66 कोटी खर्च केले, परिणामी मागील वर्षीच्या ₹ 1,18,734.95 कोटी बचतीच्या तुलनेत ₹ 1,43,923.59 कोटींची एकंदर बचत झाली होती. ही बचत त्या वर्षासाठी केलेल्या एकूण अर्थसंकल्पीय तरतुदींच्या 19.82 *टक्के* होती. बचत व आधिक्याची माहिती प्रधान महालेखापाल (लेखा व अधिदान)-I, महाराष्ट्र यांच्या कार्यालयामार्फत खर्चाच्या मासिक अहवालाद्वारे नियंत्रण अधिका-यांना नियमितपणे देण्यात आली होती. नियंत्रण अधिकाऱ्यांनी लक्षणीय तफावतीची कोणतीही कारणे दिली नाहीत (जून 2024).
- भारतीय राज्यघटनेच्या कलम 205 नुसार नियमितीकरणाची आवश्यकता असलेली 13 दत्तमत अनुदाने आणि दोन भारित विनियोजनांमध्ये ₹ 35.58 कोटी अतिरिक्त खर्च झाला. याखेरीज, 2017-18 ते 2022-23 दरम्यान 48 अनुदाने व 17 विनियोजनांमध्ये ₹ 2,990.18 कोटी अतिरिक्त खर्च मार्च 2024 अखेरीस नियमितीकरणासाठी प्रलंबित होता.
- मूळ तरतुदींच्या 16.97 *टक्के* असलेल्या 2023-24 मध्ये प्राप्त झालेल्या ₹ 1,05,373.15 कोटी पुरवणी तरतुदी अनावश्यक ठरल्या कारण प्रत्यक्ष खर्च (₹ 5,82,296.66 कोटी) मूळ तरतुदीच्या पातळीवर पोहोचला नाही.

3.7 शिफारशी

(i) राज्य शासनाने विभागांच्या गरजा आणि वाटप केलेल्या संसाधनांचा वापर करण्याची त्यांची क्षमता लक्षात घेऊन विश्वासार्ह गृहीतकांवर आधारित वास्तववादी अर्थसंकल्प तयार करावे.

(ii) बचतीला आळा घालणे, अनुदान/विनियोजनातील मोठ्या बचती आटोक्यात ठेवणे आणि अपेक्षित बचत वेळीच ओळखून ठराविक मुदतीत ती प्रत्यार्पित करणे सुनिश्चित करण्यासाठी अर्थसंकल्पाची योग्य अंमलबजावणी आणि संनियंत्रण करण्याकरिता शासनाने एक सुयोग्य नियंत्रण यंत्रणा स्थापन करणे आवश्यक आहे.

(iii) अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा अतिरिक्त खर्चाच्या प्रलंबित नियमितीकरणाच्या सर्व प्रकरणांना प्राधान्य देण्यात यावे.